# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर-वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र. १३९ दिनांक २७/०५/२०२१

## घरफोडी करुन मोबाईल हॅन्डसेटची चोरी करणा-यास तुळींज पोलीसांनी केली अटक

तुळींज पोलीस ठाणे येथे तक्रारदार श्री.नौशाद फैजान खान, वय-३२ वर्षे, व्यवसाय- मोबाईल शॉप, रा. रुम नं. १०१, बोरी कॉलनी, आचोळे रोड, नालासोपारा (पुर्व), ता. वसई, जि. पालघर यांनी तक्रार दिली की, दिनांक ०७/०३/२०२१ रोजी रात्री ११.०० वा. ते दिनांक ०८/०३/२०२१ रोजी ०७.३० वा. सुमारास माझ्या मालकीचे केटेक शॉप क्रमांक- ४६, दुबे इस्टेट नालासोपारा पु. ता. वसई, जि. पालघर. येथे अज्ञात चोरटयाने मोबाईल शॉपच्या, दुकानाचे शटरचे लॉक तोडून शॉपमध्ये प्रवेश करुन २,६७,६००/- रुपये किंमतीचे मोबाईल फोन चोरी करून नेले आहे.अशी तक्रार दिल्याने तुळींज पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नंबर I ३४२/२०२१ भा.द.वि. कलम ३८०,४५४, ४५७ प्रमाणे दिनांक ०८/०३/२०२१ रोजी २०.५९ वाजता गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे तपासात गुन्हे प्रकटीकरण पथकाने तांत्रीक विश्लेषन करून आरोपीत अमित रामबदन यादव वय १९ वर्षे रा. रुम नंबर २०३ जय अंबे नगर, गेट नंबर ०२, भाईदर पुर्व जि.ठाणे. यास अटक करून त्याचे कडून २,०६,३००/- रुपये किमतीचे मोबाईल फोन जप्त केले आहे.

सदरची कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पो.उप आयुक्त परि.मंडळ -२, श्री. अमोल मांडवे सहा.पोलीस आयुक्त. यांचे मार्गदर्शनाखाली श्री. राजेंद्र कांबळे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, तुळींज पोलीस ठाणे, सपोनी संदेश पालांडे, मिथुन म्हात्रे, पो.उपनि. ज्ञानेश्वर कोकाटे, सहापोउपनि बाळु बांदल, शिवानंद सुतनासे, अनिल शिंदे, पो.ना. सावदेकर, आनंद मोरे, शेखर पवार, पो.शि. योगेश नागरे, सुखराम गडाख, शशीकांत पोटे, विनायक राऊत, यांनी केलेली आहे.

